## अर्थसंकल्पीय अधिवेशन - २०२५
## दिनांक ०३ मार्च ते २६ मार्च, २०२५
## सत्र कालावधीतील कामकाजाची सांख्यिकीय माहिती

**सभापती :** अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवसाचे कामकाज संपलेले आहे. आता मी सत्र कालावधीतील कामकाजाची सांख्यिकीय माहिती सदनासमोर ठेवतो.

| | | |
|---|---|---|
| एकूण बैठकींची संख्या | : | **१६** |
| प्रत्यक्षात झालेले कामकाज | : | **११५ तास ३६ मिनिटे** |
| रोजचे सरासरी कामकाज | : | **७ तास १३ मिनिटे** |
| मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ | : | निरंक |
| अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ | : | **५ तास ४५ मिनिटे** |

१) **नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी व परिचय** : ०५

२) **अभिनंदनपर प्रस्ताव** : ०५

३) **शोक प्रस्ताव** : ०४

४) **प्रश्नांसंबंधी माहिती**

**(क) तारांकित प्रश्न**

(१) प्राप्त झालेल्या प्रश्नांची संख्या : २२५६

(२) स्वीकृत झालेल्या प्रश्नांची संख्या : ५२५

(३) उत्तरीत झालेल्या प्रश्नांची संख्या : ८१

**(ख) अतारांकित प्रश्न**

(१) प्राप्त झालेल्या प्रश्नांची संख्या : निरंक

(२) तारांकित प्रश्नांतून अतारांकित झालेल्या प्रश्नांची संख्या : ५४३

(३) प्राप्त झालेल्या उत्तरित प्रश्नांची संख्या : ४०
(मागील सत्रातील स्वीकृत प्रश्नांसह)

५) **अल्पसूचना प्रश्न**

(१) प्राप्त झालेली संख्या : निरंक

(२) स्वीकृत झालेली संख्या : निरंक

(३) उत्तरित झालेली संख्या : निरंक

६) **सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीसंबंधी – अर्धा-तास चर्चेच्या सूचना**

**(क) प्रश्नांच्या उत्तरातून उद्भवलेल्या -**

(१) प्राप्त झालेली संख्या : ३२

(२) स्वीकृत झालेली संख्या : २३

(३) चर्चा झालेली संख्या : ०३

**(ख) इतर बाबीतील (सर्वसाधारण )**

(१) प्राप्त झालेली संख्या : ८८

(२) स्वीकृत झालेली संख्या : ४७

(३) चर्चा झालेली संख्या : ०७

७) **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना**

(१) एकूण सूचना : ७९

(२) स्वीकृत सूचनांची संख्या : २२

(३) सभागृहात निवेदने झालेल्या सूचनांची संख्या : १३

(४) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली एकूण निवेदने : ०९

८) **म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव**

(१) एकूण प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संख्या : ०५
(२) चर्चा झालेल्या प्रस्तावांची संख्या : ०५

९) **म.वि.प.नियम २८९ अन्वये प्रस्ताव**

(१) प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संख्या : ३६
(२) मान्य झालेल्या प्रस्तावांची संख्या : निरंक
(३) चर्चा झालेल्या प्रस्तावांची संख्या : निरंक

१०) **शासकीय ठराव :**
सूचनांची संख्या : ०२

११) **लक्षवेधी सूचना**

(१) एकूण प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या : ७३४
(२) मान्य झालेल्या सूचनांची संख्या : १६९
(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या : ७८

१२) **विशेष उल्लेखाच्या सूचना**

(१) एकूण प्राप्त सूचनांची संख्या : ३७१
(२) मांडण्यात आलेल्या व पटलावर ठेवलेल्या सूचनांची संख्या : २४६

१३) **औचित्याचे मुद्दे**

(१) एकूण प्राप्त झालेले औचित्याचे मुद्दे : २५९
(२) मांडण्यात व पटलावर ठेवण्यात आलेले औचित्याचे मुद्दे : १५६

१४) **नियम ४६ अन्वये मंत्री महोदयांनी केलेली निवेदन** : ११
१५) **नियम ४७ अन्वये मंत्री महोदयांनी केलेले वैयक्तिक स्पष्टीकरण** : ०२

१६) **अल्पकालीन चर्चा (म.वि.प.नियम ९७ अन्वये )**

(१) प्राप्त सूचनांची संख्या : २३
(२) मान्य झालेल्या सूचनांची संख्या : २२
(३) चर्चा झालेल्या सूचना : ०४

१७ ) **शासकीय विधेयके - विधानपरिषद**

(१) विधानपरिषद विधेयके पुर:स्थापित करण्यात आली : ०३
(२) संमत करण्यात आलेली विधेयके : ०३

**विधानसभा**

(१) विधानसभा विधेयके पारित करण्यात आली : ०४
(२) विधानसभेकडे शिफारशीशिवाय परत पाठविण्यात
आलेली विधेयके (धन विधेयके ) : ०५

**१८) अशासकीय विधेयके**

(१) प्राप्त झालेल्या सूचना : ०५
(२) स्वीकृत सूचना : ०३
(३) पुर:स्थापनार्थ : निरंक
(४)) विचारार्थ : निरंक

१९) अशासकीय ठराव

| | | |
|---|---|---|
| (१) एकूण प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या | : | ९० |
| (२) स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | : | ७१ |
| (३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | : | निरंक |

२०) **अंतिम आठवडा प्रस्तावाची संख्या** : ०१

२१) **सन्माननीय सदस्यांची उपस्थिती**

| | | |
|---|---|---|
| (१) जास्तीत जास्त उपस्थिती | : | ९१.६७ टक्के |
| (२) कमीत कमी उपस्थिती | : | ४७.१७ टक्के |
| (३) एकूण सरासरी उपस्थिती | : | ८३.६५ टक्के |

**या अधिवेशनात "जागतिक महिला दिन" आणि "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि शताब्दी जन्म वर्षानिमित्त" मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली. तसेच भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावर चर्चा घेण्यात आली.**

**आपणांस विदित आहेच की, माझी डिसेंबर २०२४ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात सभापती पदी निवड झाल्यावर मी सभागृहात कामकाज अधिक प्रभावी व परिणामकारक करण्यासाठी चतु:सुत्री जाहीर केली होती. त्यातील पहिला मुद्दा म्हणजे प्रश्नोत्तराच्या तासाचा वेळ वाया जाऊ नये आणि एका तासात जास्तीत जास्त प्रश्न चर्चेला यावेत हा आहे. एक तासामध्ये किमान १० ते १२ प्रश्नांना न्याय मिळणे आवश्यक आहे. मला सांगण्यास आनंद होतो की, आज संपत असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासामध्ये पुकारण्यात आलेल्या आजवरच्या प्रश्नांच्या सरासरीपेक्षा जास्त संख्येने प्रश्न चर्चेला घेण्यात आले आहेत.**

दिनांक १७ मार्च, २०२५ आणि दिनांक २० मार्च, २०२५ रोजी आपण प्रत्येकी ११ प्रश्नांवर चर्चा केली. आपले सहकार्य असेच लाभले तर पुढील अधिवेशनात प्रत्येक दिवशी ही संख्या आपण १२ ते १५ पर्यंत नेऊ शकू आणि सरासरी आणखी उंचाऊ शकू, असा मला विश्वास वाटतो.

या अधिवेशनाचा समारोप करताना माननीय मुख्यमंत्री, दोन्हीही माननीय उप मुख्यमंत्री, माननीय उप सभापती, सर्व माननीय मंत्री, राज्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय तालिका सभापती, माननीय मुख्य प्रतोद/प्रतोद, माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य तसेच विधानमंडळाचे, सुरक्षा विभागाचे, मंत्रालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच माध्यमकर्मी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

---------